मुक्ताईनगर पोलीस स्टेशन जि. जळगांव
फोन नं. ०२५८३/२३४३३३
EMAIL ID- pimukatainager@gmail.com

दिनांक- १९/०६/२०२६

प्रेसनोट

# जळगाव पोलिसांचे"ऑपरेशन ड्रॉप केस "

## ( "सर्वात मोठा"आणि "यशस्वी" "सर्जिकल स्ट्राइक". )

"ड्रॉप केस' साठी कुप्रसिद्ध मुक्ताईनगर तालुक्यातील पाचही गावांवर पोलिसांचा पहाटे "सर्वात मोठा"!आणि "यशस्वी" "सर्जिकल स्ट्राइक म्हणजेच- ऑपरेशन ड्रॉप केस हे ऑपरेशन राबवले आहे

मुक्ताईनगर पोलीस स्टेशन हद्दीतील लालगोटा, हलखेडा, मधापुरी, जोंधनखेडा आणि चारठाणा ही गावे गेल्या अनेक वर्षांपासून विशिष्ट प्रकारच्या गुन्ह्यांमुळे चर्चेत आहेत. विशेष म्हणजे अल्प लोकसंख्या असलेल्या या गावांमधून सोशल मीडियाच्या माध्यमातून देशभरातील लोकांना जाळ्यात ओढून त्यांची फसवणूक केल्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत.

मधापुरी आणि हलखेडा या गावांची लोकसंख्या अवघी १००० ते १२०० दरम्यान असून लालगोटा गावात केवळ ३०० ते ४०० लोक राहतात. मात्र या गावांमधून काळी हळद, नागमणी, रेड मर्क्युरी, सफेद बिबा, उलटी वासन, सुलेमानी पत्थर, सेकंड करन्सी, अॅल्युमिनियम भंगार, जुने सोने, कॉपर, शंख आणि डबल इंजिन यांसारख्या कथित दुर्मिळ वस्तूंचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करून लोकांना मोठ्या नफ्याचे आमिष दाखवले जात असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

आमिषाने बोलावून 'ड्रॉप केस'ची अंमलबजावणी

व्हिडिओंना भुललेले लोक गावात पोहोचल्यावर त्यांना नकली नोटा, बनावट वस्तू किंवा खोट्या मौल्यवान वस्तू दाखवून लाखो रुपयांची फसवणूक केली जाते. अनेक वेळा कोणतीही वस्तू न देता थेट पैसे हिसकावले जातात. विरोध करणाऱ्यांना मारहाण करून लुटले जाते.धक्कादायक बाब म्हणजे, काही प्रकरणांमध्ये पीडित व्यक्तींकडे बनावट हरणाचे किंवा वाघाचे कातडे ठेवून त्यांचे व्हिडिओ चित्रीत केले जातात. त्यानंतर "पोलिसांकडे गेलात तर वन्यजीव तस्करीच्या गुन्ह्यात अडकवू" अशी धमकी देऊन तक्रार करण्यापासून रोखले जाते. पोलिसांच्या भाषेत या प्रकारांना 'ड्रॉप केस' म्हणून ओळखले जाते.

मागील तीन वर्षांत या परिसरात दाखल झालेल्या गुन्ह्यांची संख्या चिंताजनक आहे.

* दरोडा – १०
* खुनासह दरोडा – १
* खून – १
* जबरी चोरी – ७
* फसवणूक – १६
* दरोड्याचा प्रयत्न – १
* सरकारी नोकरावर हल्ला – २

जळगाव पोलिसांचे "ऑपरेशन ड्रॉप केस ":

या वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी जळगाव पोलिसांनी आज पहाटे मोठे ऑपरेशन ड्रॉप केस " हे विशेष अभियान राबविले. पहाटेच्या सुमारास प्रचंड मोठ्या प्रमाणात पोलिस अधिकारी, अंमलदार , आरसीपी यांनी प्लान करून एकाच वेळी या गावांमध्ये धाडसत्र राबवत संशयित आणि सराईत आरोपींना ताब्यात घेतले आहे आणि मोठ्या प्रमाणात मुद्देमाल हस्तगत केला आहे !!!

गुन्हेगारीविरोधातील निर्णायक पाऊल

अल्प लोकसंख्या असलेल्या या गावांमधून सातत्याने समोर येणाऱ्या गंभीर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर जळगाव पोलिसांनी उचललेले हे पाऊल महत्त्वपूर्ण आहे. कायद्याचा धाक निर्माण करत गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी अशा प्रकारच्या मोहिमा भविष्यातही सुरू राहतील!!

१ गु.र.नं.२५८/२०२६ शस्त्र अधिनियम कलम ३/२५ प्रमाणे

आरोपी - फरेज राजु पवार, वय ४० वर्षे, रा. मधापुरी, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव

जप्त मुद्देमाल -

१)१०,०००/-रु. किमतीची एक लाकडी मुठ असलेली लोखंडी रिव्हॉल्वर व त्यांस काडतुस भरण्यासाठी असलेले ०६ खाचे जु.वा.कि.अं.

२)५००/-रु. किमतीचे एक जिवंत काडतुस

२. गु.र.नं. ०२५९/२०२६ शस्त्र अधिनियम कलम ३/२५

आरोपी - रामजाने राईसाहेब भोसले, वय ३२ वर्षे, रा. हलखेडा ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव

जप्त मुद्देमाल - १)१०,००० रु. किमतीची एक काळी मुळ असलेली व चंदेरी रंगाचे बॅरल असलेली लोखंडी पिस्टल जु.वा.कि.अं.

२) ८०० रु. किमतीचे ०२ जिवंत काडतुस

३) ००.००/- रु.किं.चे १०० रुपये दराचे CHIDREN BANK OF INDIA चे १०० नोटांचे दोन बंडल

३ गु.र.नं. .०२६०/२०२६ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२४

आरोपी – आक्काबाई जोगिंदर भोसले, वय ३२ वर्षे, रा. हलखेडा ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव

१ ) रोख रक्कम एकुण – ६४२९००/- रु

२) १७ मोबाईल एकुण किंमत – १,१०,५००/- रु

३) सोन्या चांदीचे दागिने किंमत – ३६,००,०००/- रु

४ गु.र.नं. .०२६१/२०२६ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२४

आरोपी – रोहित सुदेश पवार , वय ३२ वर्षे, रा. मधापुरी ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव

१) रोख रक्कम एकुण – १४,००,०००/- रु

२) सोन्या चांदीचे दागिने किंमत – २,००,०००/- रु

५.गु.र.नं. .०२६२/२०२६ भारतीय न्यास संहिता कलम ३१० (४)

आरोपी १ . राजकिसन जोगिंदर भोसले २. दया जोगिंदर भोसले ३. शिवकिसन जोगिंदर भोसले ४. आक्काबाई जोगिंदर भोसले ५. जोगिंदर राजवंती भोसले रा. हलखेडा ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव

६ गु.र.नं. .०२६३/२०२६ वन्य प्राणी संरक्षण अधिनियम कलम ९

आरोपी - गांझी दरियासिंग भोसले रा हलखेडा जुने ता मुक्ताईनगर जि जळगाव

मुद्देमाल – १ नग हरणाचे कातडे , १ नग कोल्ह्याचे कातडे, १ नग खरगोश (RABBIT) चे कातडे

७ गु.र.क्र. ३२२/२०२१ भा.द.वि. कलम ३२७ वगैरे मधील पाहिजे आरोपी विलास नरविलाल पवार रा हलखेडा ता मुक्ताईनगर जि जळगाव यास अटक करण्यात आले आहे.

८ गु.र.क्र. २५७/२०२६ भा.न्या. सं. कलम ३१०(2) मध्ये आरोपी नामे अजय दादा पवार रा. हलखेडा ता. मुक्ताईनगर जि जळगाव यास अटक करण्यात आले आहे.

| |
|---|
| एकुण रोख रक्कम – २०,००,०००/- रू (वीस लाख रूपये फक्त) |
| एकुण सोन्याचे दागिने ३०० ग्रॅम वजनाचे -किंमत अंदाजे ३०,००,०००/- रू (तीस लाख रूपये फक्त) |
| एकुण चांदीचे दागिने ४ किलो वजनाचे - किंमत अंदाजे ८,००,०००/- रू (आठ लाख रूपये फक्त) |
| दोन गावठी कटटा व तीन जिवंत काडतुस |
| १ नग हरणाचे कातडे , १ नग कोल्ह्याचे कातडे, १ नग खरगोश (RABBIT) चे कातडे |
| ०४ चार चाकी वाहने व ०६ दुचाकी वाहने |
| ३० मोबाईल फोन |

मा. श्री. श्रीकांत धिवरे पोलीस अधीक्षक सो जळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि १९/०६/२०२६ रोजी कोम्बिग ऑपरेशन दरोडाग्रस्त हलखेडा, लालगोटा व मधापुरी या गावात रावबविण्यात आले. कोम्बिग ऑपरेशन करिता उपविभागीय पोलीस अधिकारी भुसावळ ,चार्ज मुक्ताईनगर श्री केदार बारबोले, परिविक्षाधीन उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. प्रशांत दरेकर , पो. नि. राहुल गायकवाड स्था.गु.शा. जळगाव, पो. नि. महेश गायकवाड भुसावळ शहर पोलीस ठाणे, पो. नि. निलेश गायकवाड भुसावळ तालुका पोलीस ठाणे, पो. नि. राहुल वाघ भुसावळ शहर पोलीस ठाणे, पो. नि. आशिष लव्हांगळे बोदवड पोलीस ठाणे , स.पो.नि. विशाल पाटील सावदा पोलीस ठाणे, स.पो. नि. योगिता नारखेडे नशिराबाद पोलीस ठाणे, स.पो. नि. मीरा देशमुख निंभोरा पोलीस ठाणे, स.पो. नि. अमित कुमार बागुल वरणगाव पोलीस ठाणे व एकुण २०० पोलीस अंमलदार यांनी सहभाग घेतला होता.


मुक्ताईनगर पोलीस



